## 1. मॉड्यूल व त्याच्या संरचना

| मॉड्यूल तपशील | |
|---|---|
| विषयाचे नाव | अकौंटन्सी |
| कोर्स नाव | प्रकरण २- भागीदारी संस्थांचे अकौंट – प्रार्थमिक संज्ञा (इयत्ता १२ वी) |
| मॉड्यूल नाव | भागीदारी संस्थांचे स्वरूप , भागीदारी करारनामा आणि स्पेशल अस्पेक्ट्स ऑफ पार्टनरशिप अकौंटन्सी |
| मॉड्यूल आयडी | एलइसी _१०२०१ _ इ-कंटेंट |
| पूर्व-आवश्यकता | भागीदारी संस्था या व्यवसाय संघटनेबद्दल चे ज्ञान |
| उद्देश | या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी खालील बाबी आत्मसात करू शकतील<br>1. अर्थ<br>2. वैशिष्टे<br>3. भागीदाराचे अधिकार<br>4. भागीदारी करारनामा – अर्थ आणि महत्व<br>5. भागीदारी करारनाम्याच्या गैरहजेरीत अकौंट पद्धतीवर परिणाम करणाऱ्या तरतुदी<br>6. भागीदारी अकौंट मधील विशिष्ठ दृष्टीकोन |
| सूचनक शब्द | भागीदारी, भागीदार , संस्था, संस्थेचे नाव, भागीदारी करारनामा |

## 2. विकास कार्यसंघ

| भूमिका | नाव | सदस्यत्व |
|---|---|---|
| राष्ट्रीय MOOC समन्वयक (एनएमसी) | प्रा अमरेंद्र पी बेहरा | सीआयईटी एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| कार्यक्रम समन्वयक | डॉ रिज्युल करीम बारभुईया | सीआयईटी, एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| कोर्स समन्वयक (सीसी) / पीआय | प्रो. शिप्रा वैद्य | डीईएसएस, एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| कोर्स कोऑर्डिनेटर (सीसी) | डॉ. निधि गुसाईन | सीआयईटी एनसीईआरटी, नवी दिल्ली |
| विषय विषय तज्ज्ञ (एसएमई) | श्री विनय सेतिया | इंद्रप्रस्थ ग्लोबल स्कूल, नवी दिल्ली |
| पुनरावलोकन टीम | कु. प्रीती शर्मा | केंद्रीय विद्यालय, सेक्शन 24, नोएडा |
| अनुवादक | श्री पराग कुकडे | |
| तकनीकी टीम | श्री. शोभित सक्सेना<br>सुश्री खुशबू शर्मा | सीआयईटी एनसीईआरटी, नवी दिल्ली<br>सीआयईटी एनसीईआरटी, नवी दिल्ली |

अनुक्रमाणिका:


१ भागीदारी – अर्थ

२ भागीदारीची वैशिष्ठे

३ भागीदाराचे अधिकार

४ भागीदारी करारनामा – अर्थ आणि महत्व

५ भागीदारी करारनाम्याच्या गैर्हजेरीतील अकौंट पद्धती

६ भागीदारी अकौंट मधील विशिष्ठ दृष्टीकोन


१. भागीदारीचा – अर्थ:

अनेक विविध रूपे आहेत ज्यामध्ये व्यापार संघटीत होऊ शकतो जसे एकमेव मालकी व्यापार,भागीदारी संस्था,हिंदू अविभक्त कुटुंब पद्धती व्यापार, सहकारी संघटना , एक व्यक्ती कंपनी, खाजगी मर्यादित कंपनी किवा जॉईन्ट स्टोक कंपनी.

जेव्हा व्यापार एका व्यक्तीच्या मालकीचा असतो आणि त्याच व्यक्तीकडून नियंत्रित केला जातो तेव्हा त्याला एकमेव मालकी व्यापार असे म्हणतात. पण तिथे जेव्हा दोन किवा अधिक लोक व्यापारांतील फायद्यात आणि तोट्यात सहभागी होतात, तेव्हा त्याला **भागीदारी** असे म्हणतात.


कलम ४ भारतीय भागीदारी व्यवसाय कायदा १९३२ या अन्वये असे सांगितले आहे की "भागीदारी हि लोकांमधील अशी नाती प्रस्थापित करते की जे कार्यरत असलेल्या व्यवसायातील फायदे आणि तोटे एकत्रित वाटून घेण्यासाठी संमत झालेले असतात, तो व्यापार त्यांनी सर्वानी कार्यरत ठेविलेला असतो किवा त्यांच्यापैकी कोणीही जो सर्वांच्या वतीने व्यापार कार्यरत ठेवीत असतो."



जे लोक भागीदारी मध्ये प्रवेश करतात त्यांना भागीदार असे म्हणतात आणि त्यांच्या समूहाला एकत्रितपणे संस्था असे म्हणतात.

२. भागीदारी व्यापाराची वैशिष्ठे

भागीदारी व्यापाराची महत्वाची वैशिष्ठे खालील प्रमाणे आहेत:




क) दोन किवा अधिक व्यक्तींचा समूह:

- भागीदारीसाठी तेथे  कमीत कमी दोन व्यक्ती असल्याच पहिजेत.
- नियम १० कंपनी (मिस.) कायदे ,२०१४ यामध्ये सांगितल्या प्रमाणे केंद्र सरकारने सर्वाधिक भागीदारांची संख्या ५० इतकी निश्चितपणे ठरवून दिली आहे. (भारतीय कंपनी कायदा २०१३ यांनी हि मर्यादा १०० पर्यंत ठेवीली आहे.) भारतीय करार कायदा १८७२ या मध्ये सांगितल्याप्रमाणे खालील अपवाद वगळता प्रत्येक व्यक्ती करार करण्यासाठी सक्षम असते:

  अ) एक अल्पवयीन ज्याचे किवा जिचे वय १८ वर्षे यापेक्षा कमी आहे;

  आ) अशी व्यक्ती जिची मनस्थिती अबाधित आहे;

  इ ) अशी व्यक्ती की जी कुठल्याही कायद्याप्रमाणे अपात्र आहे. इ.



ख) करार:

- भागीदारी कराराद्वारे अस्तित्वात येते.
- करार तोंडी कीवा लेखी असू शकतो
- कराराद्वारे त्यांच्यातील नात्याला आधार मिळतो.



ग) व्यापार:



- भागीदारी संस्था हि केवळ कायदेशीर व्यापार कार्यरत ठेवीण्यासाठी च्या हेतूनेच अस्तित्वात येते.
- व्यापारानामध्ये वस्तूंचा व्यापार,व्यवसाय आणि गुणवत्तेचा सेवा व्यवसाय (व्होकेशन) यांचा समावेश होतो.
- कोणतीही संस्था जी दान तत्वावर, सामाजिक कार्यासाठी किवा विश्रांती साठी अस्तित्वात येते तीला भागीदारी व्यापार संस्था म्हटले जात नाही.


घ) फायद्यांतील सहभाग



- भागीदारांमधील करार फायदे किवा तोटे एकत्रित सहभागाने घेण्यासाठीच असतो;
- हे काही आवश्यक नाही सर्व भागीदारांनी नुकसानामध्ये हिस्सा घेतलाच पाहिजे.( त्यासंबंधी भागीदारी करारनाम्यामध्ये नमूद केले असलेच पाहिजे)

ङ) परस्पर माध्यम:

- भागीदारी संस्थेचा व्यापार हा सर्व भागीदारांनी मिळून कार्यरत केला जातो किवा कुठल्याही एका भागीदाराने जो सर्वांसाठी कार्य करत असतो त्याच्याकडून कार्यरत केला जातो.
- भागीदार हे संस्थेचे परस्पर माध्यम असतात आणि प्रमूख असतात.
- एक माध्यम म्हणून भागीदार इतर भागीदारांना दर्शवितात आणि त्याद्वारे त्यांच्या क्रियांमधून एकमेकांना बाधित असतात आणि प्रमूख म्हणून ते इतर भागीदारांच्या ज्रीयाना बाधित राहतात.
- उदा.समजा अ आणि ब हे भागीदार आहेत. जर अ व्यापारी करारमध्ये आला तर ब सुद्धा त्याद्वारे बाधित राहील. येथे अ हा ब चा एजट म्हणून काम पाहिल.







## मर्यादित उत्तरदायित्व असलेली भागीदारी

- मर्यादित उत्तरदायित्व भागीदारी कायदा २००८ अस्तित्वात आल्यापासून एक नवीन प्रकारची भागीदारी संस्था अस्तित्वात आली ती मर्यादित उत्तरदायित्व भागीदारी (एल.एल.पी.) म्हणून ओळखली जाते.
- या भागीदारी प्रकारामध्ये भागीदारांचे उत्तरदायित्व हे मर्यादित असते ते त्यांच्या भांडवल सहभागीतेच्या मुल्यापर्यंत आणि तेथे सर्वाधिक भागीदारांच्या संख्येला मर्यादा नसते.
- **एल.एल.पी.ची प्रमूख वैशिष्ठे खालीलप्रमाणे आहेत:**

  अ) एल.एल.पी. चे नाव हे कंपनीच्या नोंदणी कार्यालयामार्फत संमत झालेले असलेच पाहिजे.

  आ) एल.एल.पी.चा करार कंपनीच्या अधिक्षकाकडे फाईल झाला असलाच पाहिजे.

३. भागीदारांचे अधिकार खालीलप्रमाणे आहेत:

- व्यापाराच्या व्यवस्थापनात सहभागी होण्याचा अधिकार
- व्यापारांतील घडामोडींवर सल्ला घेण्याचा अधिकार
- कंपनीची हिशेब पुस्तके तपासण्याचा आणि त्याची एक प्रत स्वतः साठी मिळविण्याचा अधिकार
- संमत केलेल्या गुणोत्तर प्रमाणात फायदे आणि तोटे यांमध्ये इतरांबरोबर सहभागी होण्याचा अधिकार
- त्याने दिलेल्या कर्जावरती संमत दराने व्याज मिळविण्याचा अधिकार
- नवीन भागीदाराच्या प्रवेशास संमती न देण्याचा अधिकार
- अचूक नोटीस देऊन दिल्यानंतर संस्थेमधून निवृत्त होण्याचा अधिकार
- भागीदाराने संस्थेच्या वतीने केलेल्या देयांकांचे संस्थेकडून भरपाई घेण्याचा अधिकार




४. भागीदारी करारनामा –

४.१ अर्थ :

- भागीदारी हि करार झाल्याच्या परीणांमास्तव अस्तित्वात येते , तो तोंडी किवा लेखी असू शकते.
- लेखी करारनाम्या च्या दस्तऐवज यांना भागीदारी करार नामा असे म्हणतात.
- त्यामध्ये भागीदारीच्या अटी शर्ती नमूद असतात.
- ते सर्व भागीदारांकडून स्वाक्षरी करून झालेले असते.
- हे सक्तीचे नसले तरी सुद्धा करार हा लेखी स्वरुपात असणे हे उत्तम असते ज्याने भविष्यातील कलह टाळले जाऊ शकतात. तो न्याय व्यवस्थेच्या दरबारांत एक उत्तम पुरावा म्हणून सुद्धा असतो.

४.२ भागीदारी करार्नाम्यांतील अंतर्भूत घटक खालीलप्रमाणे आहेत :

अ) भागीदारांचे नाव, वर्णन आणि पत्ते;

आ) भागीदारी संस्थेच्या प्रमूख कार्यालयाचे नाव, स्वरूप आणि पत्ता;

इ) भागीदारीचा कालावधी (जर असल्यास);

ई) व्यापार आरम्भाची तारीख;

उ) प्रत्येक भागीदाराने गुंतविलेल्या भांडवलाची रक्कम ;

ऊ) फायदे वाटपाचे गुणोत्तर ;

ऋ) भांडवलावरील व्याजाचा दर, भागीदाराने स्व खर्चासाठी व्यापारांतून घेतलेल्या रक्कमेवरील व्याजाचा दर, भागीदाराने घेतलेल्या कर्जांवरील व्याजाचा दर ;

ऌ) भागीदारांमधील वाद निर्णायकपणे सोडविण्याची पद्धती ;

ऍ) भागीदारांचे अधिकार आणि कर्तव्ये ;

ऐ) भागीदारांच्या निवृत्तीनंतर वा मयतीनंतर आणि संस्थेच्या विघटनानंतर चे वेळी अकौंट ची सेटलमेंट ;

ए) भागीदारांना द्यावयाची वेतनाची किवा कमिशन ची रक्कम (जर संमत केली असेल);

ऐ) व्यापारांतील मालमत्तेची मुल्यसारणी पद्धती जेव्हा व्यापाराची पुनःरचना केली जाईल आणि व्यापाराच्या सनचालनासाठी आणि वहनासाठी संबंधित असणारे इतर सर्व मुद्दे इ.

५. भागीदारी करारनाम्याच्या गैर्हजेरीतील काही महत्वाच्या बाबींवरील अकौंट पद्धती:

भागीदारी करारनाम्याच्या गैरहजेरीत किवा भागीदारी करारनामा शिथिल असताना जसे त्याने खालील बाबींवर काहीच स्पष्टीकरण दिलेले नसेल तेव्हा भारतीय भागीदारी कायदा १९३२ यांतील तरतुदींचा वापर करता येतो :

| बाब | भारतीय भीदारी कायदा १९३२ प्रमाणे दिलेली तरतूद |
|---|---|
| फायदे किवा तोटे यांचे विभाजन करणे | फायदे आणि तोटे हे समसमान विभाजित झाले पाहिजेत |
| भांडवलावरील व्याज | भागीदाराना भांडवलावर व्याज देण्याची परवानगी नाही. |
| भागीदाराने व्यापारातून स्वखर्चासाठी घेतलेल्या रक्कमेवरील व्याज | भागीदारांकडून व्यापारातून स्वखर्चासाठी घेतलेल्या रक्कमेवरील कोणत्याही प्रकारचे व्याज आकारता येत नाही |
| भागीदाराने व्यापारातून घेतलेल्या कर्जावरील किवा व्यापारासाठी आगाऊ दिलेल्या रक्कमेवरील व्याज | कर्जांवरील व्याज हे दर साल दर शेकडा ६ टक्के दराने देण्याची परवानगी आहे. |
| भागीदारांसाठी वेतन/मानधन/कमिशन | भागीदारांना कुठल्याही प्रकारचे वेतन / मानधन वा कमिशन देण्याची परवानगी नाही. |

भारतीय भागीदारी कायदा १९३२ यांतील आणखीन काही महत्वाच्या तरतुदी अशा आहेत :

- एखादी व्यक्ती भागीदार म्हणून भागीदारी संस्थेमध्ये प्रवेश घेऊ शकते त्यांसाठी एकतर सर्व अस्तित्वात असलेल्या भागीदारांची संमती असणे आवश्यक आहे किवा भागिदारी कराराप्रमाणे जो भागीदारांमध्ये अगोदर संमत झालेला आहे त्याप्रमाणे प्रवेश घरु शकते.
- एखादी व्यक्ती भागीदारी संस्थेमधून निवृत्त होऊ शकते त्यासाठी एकतर सर्व अस्तित्वात असलेल्या भागीदारांची संमती असणे आवश्यक आहे किवा भागिदारी कराराप्रमाणे जो भागीदारांमध्ये अगोदर संमत झालेला आहे त्याप्रमाणे निवृत्त होऊ शकते.
- एक अल्पवयीन म्हणजे वय वर्षे १८ पेक्षाही कमी असलेली व्यक्ती सुद्धा फक्त भागीदाराच्या फायद्यासाठी भागीदारी संस्थेमध्ये प्रवेश घेऊ शकते पण त्यासाठी सर्व अस्तित्वात असलेल्या भागीदारांची संमती असणे आवश्यक आहे.
- जरी भागीदारांनी संमत केले नसेल तरीसुद्धा भागीदाराच्या मृत्यूनंतर भागीदारी संस्थेचे विघटन होत असते.

६. भागीदारी अकौंट मधील विशिष्ठ दृष्टीकोन

एकमेव मालकी व्यापारातील समसमान तत्वांचा उपयोग करून भागीदारी संस्थेचे अकौंट हे तयार केले जातात. याशिवाय, खाली नमूद केलेले काही अधिकतम दृष्टीकोन असतात :

अ) भागीदारांची भांडवल खाती ;

आ) फायदे किवा तोटे यांचे भागीदारांमध्ये विभाजन ( भागीदारांच्या भांडवलांवरील व्याज, भागीदारांनी व्यापारांतून स्वखर्चासाठी घेतलेल्या रक्कमेवरील व्याज, भागीदारांना वेतन किवा कमिशन ) ;

इ) भागीदारांनी व्यापाराला दिलेल्या कर्जावरील व्याज ;

ई) भूतकाळात झालेल्या फायद्याचा चुकीचा विनियोग यासाठी समायोजन ;

उ) फायद्यांची खात्री ;

ऊ) भागीदारी संस्थेची पुनरचना ;

ऋ) भागीदारी संस्थेचे विघटन